# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

## ।। प्र क ट न ।।

**विषय– सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेसाठी खाजगीरित्या (Private Candidate) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणी (Enrollment Certificate) प्रमाणपत्राबाबत व सदर विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे नियमित व विलंब शुल्काने ऑनलाईन सादर करण्याच्या तारखांबाबत...**

सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या (Private Candidate) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी प्रमाणपत्रासाठी (Enrollment Certificate) नियमित शुल्कासह अंतिम मुदतीने ऑनलाईन अर्ज दि.३०/०१/२०२१ ते दिनांक ०२/०२/२०२१ पर्यंत व विलंब शुल्काने दि.१०/०२/२०२१ पर्यंत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने जे विद्यार्थी नाव नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांची नाव नोंदणी प्रमाणपत्रे (Enrollment Certificate) दिनांक २५/०१ /२०२१ पासून त्यांच्या भ्रमणध्वनीवर व ईमेलवर संदेश (SMS) उपलब्ध करुन देण्यास सुरुवात झालेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी आपले स्वत:चे नावनोंदणी प्रमाणपत्र http://form 17.mh-hsc.ac.in व http://form 17.mh-ssc.ac.in या संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावीत.

सदर नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना यापूर्वी नियमित शुल्काने दि.२५/०१/२०२१ ते १३/०२/२०२१ पर्यंत आवेदनपत्रे सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते. याबाबत पुन:श्च मुदतवाढ देण्यात येत असून सदर खाजगी विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे नियमीत व विलंब शुल्काने ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर आवेदनपत्रे भरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| शुल्क प्रकार | सन २०२१ च्या परीक्षेसाठी नाव नोंदणी केलेल्या खाजगी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन पध्दतीने परीक्षेची आवेदनपत्रे माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावयाच्या तारखा |
|---|---|
| अ) नियमित शुल्कासह | सोमवार दि. २२/०२/२०२१ ते रविवार दि. २८/०२/२०२१ |
| ब) विलंब शुल्कासह | सोमवार दि. ०१/०३/२०२१ ते रविवार दि. ०७/०३/२०२१ |

अ) नियमित व विलंब शुल्काच्या आवेदनपत्राची मूळ प्रत शुल्कासह (रोखीने अथवा धनाकर्षाव्दारे) त्वरित विभागीय मंडळाकडे सादर करण्याबाबत विद्यार्थी व मुख्याध्यापक संबंधित माध्यमिक शाळा व प्राचार्य, उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विभागीय मंडळांकडे जमा करण्यात यावी.

इ.१०वी व १२वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने नियमीत व विलंब शुल्कासह स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. कोविड–१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासनाने व विशेषतः आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

२. उपरोक्तप्रमाणे आवेदनपत्रे नियमीत शुल्काने व विलंब शुल्काने भरावयाच्या तारखामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे–०४

प्रति, प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये व खाजगी विद्यार्थी-
संपर्क केंद्रे, सातारा/ सांगली/ कोल्हापूर इ.१०वी/ १२वी-
सन 2021 मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी खाजगीरित्या-
प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी प्रमाणपत्राबाबत व-
परीक्षेचे आवेदनपत्रे नियमित व विलंबशुल्काने भरणे
बाबत वरील प्रकटनाची नोंद घेवून त्याप्रमाणे कार्यवाही-
करण्यात यावी.

(श्री. देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर